# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**परभणी-431402(महाराष्ट्र) भारत**

Vasantrao Naik Marathwada Krishi vidyapeeth

**Parbhani-431 402 (Maharashtra) India**

---

वाचा - जा.क्र.अेपीआर-२/बदली/२०१९ दिनांक- २९ /११/२०१९

एकाच कार्यालयात / मुख्यालयामध्ये पाच वर्षापेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची माहीती संदर्भात मार्गदर्शक सुचना.

## परिपत्रक

**जा.क्र.अेपीआर-२/बदली/सुचना/२०१९**

**दिनांक- १७/१२/२०१९**

वरिल वाचा येथील निर्गमीत परिपत्रकात एकाच कार्यालयात / मुख्यालयामध्ये पाच वर्षापेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची माहीती दिलेल्या नमून्यात पाठविणेबाबत सुचित करण्यात आले होते.त्यानुसार या कार्यालयाकडे काही कार्यालयाची माहीती प्राप्त झाली.

त्यामध्ये केवळ कार्यरत कार्यालयातील सेवा कालावधी गृहीत धरुन माहीती सादर केलेली आहे. तसेच अशी माहीती सादर करतांना केवळ शिक्षेकेत्तर कर्मचारी यांची माहीती सादर केलेली असून दिलेल्या नमुन्यात एकत्रीत पाठविण्यात आलेली आहे.

त्यामुळे,सदरची माहीती अपेक्षीत असल्याप्रमाणे प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रकरणी मार्गदर्शक सूचना देण्याची बाब विचाराधीन होती, आता याव्दारे खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१.कार्यालय प्रमुख यांचेकडून प्राप्त झालेली माहीती ही केवळ त्या कार्यालयातील सेवा कालावधी विचारात घेऊन सादर केलेली आहे. तसे न करता त्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधी गृहीत धरतांना मुख्यालयातील सेवा कालावधीचा विचार करण्यात यावा.

२. कार्यालय प्रमुखांनी त्याचे अधिनिस्त एकाच कार्यालयात / मुख्यालयामध्ये पाच वर्षापेक्षा अधिक सेवा कालावधी झालेल्या सर्व बदली पात्र अधिकारी/कर्मचारी यांचे कडून वरील वाचा येथील परीपत्रकामध्ये दिलेला संपुर्ण नमूना एकाच अधिकारी / कर्मचारी यांची माहीती भरण्यासाठी वापरावा.

३. सदर माहीती मधून अन्नतंत्र महाविद्यालय परभणी,सामुदायीक विज्ञान महाविद्यालय परभणी, विलासराव देशमुख,जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,लातुर येथील केवळ शिक्षक वर्गीय अधिकारी/कर्मचारी वगळता इतर सर्व महाविद्यालय/कार्यालय/संशोधन केंद्र/ योजना/कृषि विज्ञान केंद्र येथील सर्व शिक्षक वर्गीय/ शिक्षेकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहील.

४.अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वैयक्तीकरीत्या भरुन दिलेली माहीती कार्यासन प्रमुखांनी तपासून/पडताळणी करुन अशा सर्व बदली पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांची संकलीत माहीती या कार्यालयाकडे ३१ जानेवारी २०२० पर्यंत पाठवावी.

प्रकरणी, ज्या कार्यालयानी माहीती सादर केलेली आहे त्यांनी वरील सुचने प्रमाणे फेर माहीती पाठवावी.

कुलसचिव

Notice section 2019